**सीएनआर नं. एमएचएसआय ०७—०००१०९—२०१४**

**नि.दि.मु.क्र. २९/२०१४ मधील नि.क्र. ४३ वरील आदेश**

प्रस्तुतचा दावा कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दि. ०५/०६/२०१७ रोजी झालेला आदेश रद्दबातल करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जातील प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र. १ हा मे महिन्यापासून हायपर टेन्शन, दमा आणि मधुमेहाच्या आजारामुळे त्रस्त असल्याने त्याला त्याच्या विधीज्ञांना भेटून दाव्याबाबत कागदपत्र व माहिती देणे शक्य झाले नाही. सदर प्रतिवादी पुणे येथील डॉ. के.पी.बेलसरे यांच्याकडे वैद्यकीय उपचार घेत होता. त्यांनी त्याला जुलै महिन्यांपर्यत विश्रांती व वैद्यकीय उपचार घेण्याचा सल्ला दिला होता. तो गैरहजर राहिल्याने त्याला त्याच्या विधीज्ञांना भेटून माहिती न देता आल्याने त्याच्याविरुध्द वादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश पारीत झालेला आहे. त्या पाठीमागे त्याचा कोणताही हलगर्जीपणा अथवा बेफिकिरपणा नव्हता. अर्जासोबत प्रतिवादीने वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. वर नमूद आदेश रद्दबातल न झाल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. अर्ज मंजूर करण्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब वरनमूद आदेश रद्दबातल करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन प्रतिवादींनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. वादीने प्रस्तुत अर्जाकरीता नि.क्र. ४६ वर आपले म्हणणे सादर करुन अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादीने दाखल केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र पाहता १० ते १५ वर्षापासून त्याचेवर उपचार चालू आहेत असे दिसते. त्यामुळे जर प्रतिवादी आजारी असता तर त्यास कैफियत देखील देणे शक्य झाले नसते. प्रतिवादींचा हा खोडसाळ अर्ज दाखल झालेला असल्याने तो नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनाम्याचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि. २०/०६/२०१६ रोजी नि. ३२ वर वादीतर्फे साक्षीदार क्र. १ विष्णू भागेश्वर मेस्त्री याच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्यात आलेले असून, प्रतिवादींनी सदर साक्षीदाराचा उलटतपास न घेतल्याने प्रतिवादींतर्फे साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश दि. ०५/०६/२०१७ रोजी पारीत करण्यात आलेला आहे. प्रथमदर्शनी अर्जातील नमूद कारणे संयुक्तिक वाटत नाहीत. तथापि; दाव्यातील मागणी ही कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळण्याकरीता असल्याने प्रतिवादींना न्यायाच्या दृष्टिकोनातून वादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी देणे उचित वाटते. तसे करण्याने दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यास सुलभ होणार आहे. तथापि, प्रतिवादींनी याकामी केलेला विलंब लक्षात घेता त्यांच्यावर रक्कम रु. २००/— इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीस देवू करुन अर्ज मंजूर करावा लागेल. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादींवर रक्कम रु. २००/— (रक्कम रु. दोनशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. ३२ वरील दि. ०५/०६/२०१७ रोजीचा वादीतर्फे साक्षीदार क्र. १ विष्णू भागेश्वर मेस्त्री याचा प्रतिवादींकडून उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादींनी वादीस पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :—०८ फेब्रुवारी २०१८ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.